विद्या विकास मंडळ

रामकृष्ण महादेव साळगांवकर उच्च माध्यमिक विद्यालय

मडगांव गोवा

प्रथम सत्र परीक्षा - ऑक्टोबर २०२४

इयत्ता : अकरावी | विषय : मराठी (व्दितीय भाषा) | वेळ : ३ तास

दिनांक : २४।१०।२०२४ | गुण : ८०

सूचना : १. शुध्द्लेखनाचे नवीन नियम पाळावेत.

२. उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

## विभाग 1 - व्याकरण

खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा.

1. मऊ 1
2. नाद 1
3. पवित्र 1

खालील शब्दांची विशेषणे लिहा.

4. नियम 1
5. उपद्व्याप 1
6. कुटुंब 1

खालील शब्दांचे विरूध्दार्थी शब्द लिहा.

7. कच्चा 1
8. चढ 1
9. न्याय 1

खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा.

10. भाऊ 1

11. कवी 1

12. सम्राज्ञी 1

खालील शब्दांचे वचन बदलून लिहा.

13. वृक्ष 1

14. कट्टा 1

15. बी 1

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा.

16. आई दुकानाच्या फळीवर जाऊन उभी राहताच त्याने पेटी उघडण्याचे काम थांबवले व तो उभा राहिला. 4

## विभाग 2- गद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.

17. विनोबांच्या वडिलांनी विनोबांना सोळाव्या वर्ष लागल्यानंतर मारायचे बंद का केले? 1

18. माधवची आई पायात काय घातल्याशिवाय बाहेर पडत नसत ? 1

19. ज्ञानदेवांना ईश्वरनिष्ठाचे नेतृत्व कोणासारखे हवे आहे ? 1

खाली दिलेली वाक्ये योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.

20. माधव ओल्या डोळ्यांनी परत घरी आला कारण............... 1

अ. त्याला दवाखान्यात डॉक्टर भेटला नाही.

आ. त्याला वाटेत पोहे खायला मिळाले नाही.

इ. दामलेने त्याच्या थोबाडीत दिली होती.

21. चुन्याच्या घाण्याबरोबर फिरताफिरता कथानायकाने............. 1

अ. स्वतःला वाचनमंदिरात वरच्या सज्ज्यात अडकून घेतले होते.

आ. स्वतःचा पाय अडकवून घेतला होता.

इ. स्वतःच्या कमरेला लंगोटी गुंडाळून तळ गाठण्याचा प्रयत्न केला होता.

22. पसायदानाच्या अवघ्या नऊ ओव्यात ज्ञानदेवांनी.................... 1

अ. आदर्श समाजाची गुणवैशिष्ट्ये नमूद केली आहेत.

आ. महामानवांच्या कार्याचा परिचय करुन दिला आहे.

इ. पसायदानाचा अर्थ स्पष्ट केला आहे.

खालील वाक्याचे संर्दभासह स्पष्टीकरण लिहा.

23. " मऊ लागलं म्हणून कोपरानं खणायचं काय? 5

किंवा

" काय करतोस खाली येऊन ? आम्ही खालीच आहोत ना. आमचा काय उपयोग आहे ?"

खालील प्रश्नाचे उत्तर 7 ते 8 ओळीत लिहा.

24. 'योगी वडील' या पाठात विनोबांच्या वडिलांच्या व्यक्तिमत्वाचे कोणते विशेष पैलू दिसून येतात ?

किंवा

सण- समारंभांना कालसुसंगत नवे रूप कसे देता येईल ? 5

## विभाग 3 - पद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा.

25. वाळवंटात खेळ कोणी मांडलेला आहे ? 1

26. कवी दा.अ. कारे यांनी गोमन्तदेवीकडे शेवटी कोणती इच्छा व्यक्त केली आहे ? 1

27. घरासाठी कोणाचा मेळ लागतो असे कवी गोखले म्हणतात ? 1

खाली दिलेली कवितेच्या ओळी योग्य पर्याय निवडून पूर्ण करा.

28. क्रोध अभिमान केला ______ । एका एका लागतील पायी रे ॥ 1

29. जैसी हरळांमाजि रत्नकिळा, कि रत्नामाजि हिरा ______ । 1

30. ______ धरित दुधसागरहि शिरी । 1

( पायातळी ,दुग्धधार, निळा, पावठणी)

खालील कवितेतील ओळीचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.

31. तारांमधे बारा रासी 5

सप्तवारांमाजि रवीससी

या दिपीचेआं भासांमधे तैसी

बोली मराठिया ॥

किंवा

कुठे नदी आणि कसले पाणी

ठाऊक नव्हते काही त्यांस

अंधाराचा डोह तेवढा

राही व्यापुनिया डोळयांस

खालील प्रश्नाचे उत्तर 7 ते 8 ओळीत लिहा.

32. संत तुकारामांनी पंढरपुरात चाललेल्या वारकऱ्यांच्या भक्तिसोहळयाचे वर्णन कसे केले आहे? 5

किंवा

घराला घरपण कशामुळे लाभते, असे कवी चंद्रशेखर गोखलेनां वाटते ?

## विभाग 4 - लेखन

खाली दिलेल्या वाक्प्रचारांचा योग्य पर्याय निवडून लिहा.

33. हजेरी लावणे_______________ 1

- कानउघाडणी होणे
- आठवणीत राहणे
- अमर्याद फायदा घेणे
- ठसा उमटणे

34. चेंगरून गेल्यासारखे वाटणे_______________ 1

- काही न खावेसे वाटणे
- खूप भूक लागणे
- गुदमरून जाणे
- दिमाख वाटणे

35. नाकासमोर चालणे______________ 1

- लाज वाटणे
- सरळ वागणे
- सुटका झाल्यासारखे वाटणे
- स्वत:चे स्वत:त पाहणे

36. अंतर्मुख होणे______________ 1

- डाग लागणे
- वाईट वाटणे
- आकर्षित करणे
- विचारमग्न होणे

खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

बाबा आमटे यांचे पूर्ण नाव मुरलीधर देवीदास आमटे.महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यात ते जन्मले.काही काळ वरोरा येथे वकिली केली.समाजकार्यात उतरून नगरपरिषदेचे अध्यक्ष बनले.'भारत छोडो' चळवळीत भाग घेऊन तुरुंगवास सोसला.महात्मा गांधी यांनी त्यांना पुढे 'अभयसाधक' हे नाव दिले.वरोरा येथे बाबांनी 'आनंदवन' नावाची कुष्ठरोग्यांची वसाहत स्थापन करून त्यांच्या सेवेत पुर्नवसनास स्वत:ला वाहून घेतले. पण घरातून या कामाला पाठिंबा नसल्याने त्यांनी घर सोडून बायको मूलांसह रानात राहणे पसंत केले. कुष्ठरोग्यांना रोगमुक्त करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करणाऱ्या या कर्तबगार पुरुषाला 'अपंगशाहीचे पंतप्रधान' असेही संबोधले जाते.अशा सामाजिककामात रमलेल्या बाबांनी अशोकवन, सोमनाथ ,नागेपल्ली, लोकबिरादारी,भामरागड,हेमलकसा असे दिविध प्रकल्प उभारले. आदिवासी लोकांना साक्षर करणे,तरुणांना सुतारकाम आणि तांत्रिकशिक्षण उपलब्ध करून आत्मर्निभर बनिवणे ,अशी सामाजिक कामे बाबांनी केली. त्यांच्या पत्नी साधनाताई यांनी तसेच मुलगे विकास व प्रकाश यांच्याही सामाजिक कार्याची दखल घेण्यात आली.दामियन दत्तन पुरस्कार,जमनालाल बजाज पुरस्कार, रामन मॅगसेसे पुरस्कार, 'युनो' चा मानव हक्कपुरस्कार बाबांना लाभले. पात (पात्रता) असुनही नोबेल पुरस्कार समिती मात्र बाबांपर्यंत पोहचू शकली नाही.

- नारायण धारगळकर

प्रश्न :

37. बाबा आमटे याचं पूर्ण नाव काय ? 1

38. समाजाच्या उध्दारासाठी बाबांनी कुठे व कसले प्रकल्प केले? 2

39. बाबांना कोणकोणते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले ? 2

40. 'अथर्व उच्च माध्यमिकविद्यालय' पेडणे येथे 'वनमहोत्सव दिन' आयोजित केला आहे. या कार्य क्रमाची कार्यक्रमपत्रिका तयार करा. 5

41. 'खेळाचे महत्व' या विषयावर दोन मित्र/ मैत्रिणीमधील संवाद सुमारे 10 ते12 ओळीत लिहा. 5

42. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे पंचवीस ओळीचा निबंध लिहा. 10

मी समाज सुधारक झालो तर....

किंवा

शहरातील कचरा समस्या

किंवा

मी पाहिलेला सूर्यास्त

किंवा

वाचनालयाचे आत्मवृत्त

किंवा

माझे आवडते पुस्तक